स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांद्वारे (केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी) प्रसारित करण्यात येणाऱ्या मुलाखती इ. बाबत..

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक:- स्थास्वसं-११०३/प्र.क्र.३२/का.०५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १७ मार्च, २००५

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी समक्रमांकाने दि. १० मार्च, २००५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचे आचारसंहितेचे कालावधीमध्ये इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे (केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी) याद्वारे राजकीय स्वरूपाच्या मुलाखती किंवा असा इतर कार्यक्रमांचे प्रसारण करण्याबाबत काढलेले आदेश रद्द करण्यात येत असून आचारसंहितेच्या कालावधीमध्ये इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे (केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी) यांना राजकीय स्वरूपाच्या मुलाखती किंवा असा इतर कार्यक्रमाचे प्रसारणासाठी पूर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही. मात्र अशा प्रसारणाशी जबाबदार असणाऱ्या केबल नेटवर्क किंवा स्थानिक वाहिनी तसेच सहभागी होणाऱ्या राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या आचारसंहितेचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. तसेच या प्रसार माध्यमांतून जाहिरात प्रसिध्द केल्यास त्याचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( महेन्द्र ब. वारभुवन )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
(१) सर्व विभागीय आयुक्त
(२) सर्व महानगर पालिका आयुक्त
(३) सर्व जिल्हाधिकारी
(४) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा / नगर पंचायती
(५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
(६) निवड नस्ती

C:\My Documents\MAHALE\code of conduct.doc/est

332

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रचार...

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००१/प्र.क्र. ४/का-५.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ९ एप्रिल, २०१०.

आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रचार करण्यासाठी राजकीय नेते, कार्यकर्ते व इतर व्यक्ती त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीबाहेरुन येऊन प्रचार करतात. अशा व्यक्ती जर जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर जर त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत राहिले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. निवडणुका शक्य तेवढया मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने पढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रचार करण्यासाठी जे राजकीय नेते, कार्यकर्ते व इतर व्यक्ती त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीबाहेरुन येतात त्यांनी त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतील जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीमध्ये वास्तव्य करु नये.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

( रा. नी. पांडे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
पोलिस महासंचालक
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व पोलिस आयुक्त / पोलिस अधिक्षक
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा रोड,मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ८ नोव्हेंबर, २०११.

**आ दे श**

क्रमांक-रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का-०५.- ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने महानगरपालिका, नगर परिषदा / नगर पंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रितीने देण्यास कसूर केली तर अशा उमेदवारास अनर्ह ठरविण्याबाबत अधिनियमात तरतूद केली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीचा खर्च कशाप्रकारे सादर करावा यासंदर्भात क्रमांक-एसईसी-१०९५/१०१/डेस्क-३, दिनांक- ७ फेब्रुवारी, १९९५ अन्वये आदेश दिले आहेत. तसेच उमेदवाराने विविध निवडणुकांमध्ये करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादादेखील वेळोवेळी निश्चित करण्यात येते.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त विहित करण्यात आलेल्या खर्चाच्या मर्यादेमधून महत्वाचे राजकीय पुढारी (Star Compaigners) यांच्या प्रचार दौऱ्याचा प्रवास खर्चास सूट देण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४), नागपूर शहर

महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २) च्या कलम ९बी (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा. ५) च्या कलम ९ए (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

(१) निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना प्रसिध्द केल्यापासून ७ दिवसांच्या आत राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षांनी त्यांच्या महत्वाचे राजकीय पुढारी (Star Compaigners) यांची यादी संबंधित महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त तसेच नगर परिषद/नगर पंचायती आणि जिल्हा परिषदा/पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावी.

(२) मान्यताप्राप्त नोंदणीकृत राष्ट्रीय, राज्यस्तरीय तसेच इतर राज्यातील राज्यस्तरीय राजकीय पक्ष यांना २० महत्वाचे राजकीय पुढारी यांची यादी सादर करता येईल. तसेच इतर अमान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्ष यांना १० महत्वाचे राजकीय पुढारी यांची यादी सादर करता येईल.

(३) उपरोक्त राजकीय पक्षांच्या महत्वाच्या पुढाऱ्यांचा (Star Compaigners) निवडणुकीच्या प्रचाराकरिता जाण्याचा तसेच परतीच्या प्रवासाच्या खर्चास संबंधित उमेदवारांच्या निवडणूक खर्चामधून वगळण्यात येईल.

(४) मात्र कोणत्याही उमेदवारास स्वत:च्या प्रभागामध्ये स्वत:चे नाव महत्वाचा राजकीय पुढारी म्हणून घोषित करता येणार नाही. प्रत्येक उमेदवाराने त्याच्या स्वत:च्या निवडणूक प्रभागामध्ये प्रचाराकरीता केलेल्या सर्व प्रवासखर्चाचा समावेश त्याच्या निवडणूक खर्चात होईल.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत:-

१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त व अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये
प्राण्यांचा वापर करण्यास प्रतिबंध करणेबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. २६/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २३/१२/२०११

## परिपत्रक

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, या निवडणुकांमध्ये निवडणूक लढविणारे उमेदवार तसेच राजकीय पक्ष निवडणूक प्रचारासाठी किंवा काही बाबींचा निषेध करण्यासाठी प्राण्यांचा वापर करतात. यामध्ये बैल, हत्ती, गाढव, इ. प्राण्यांना चपलांचा हार घालणे, त्यांच्या तोंडाला काळे फासणे इ. प्रकारे त्यांचे हाल करण्यात येतात. हे प्रकार अमानवी असून प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, १९६०(Prevention of Cruelty to Animals Act, 1960) च्या उद्देशाशी विसंगत आहेत. या अधिनियमाच्या कलम ११ व ३१ च्या तरतुदीन्वये अशी कृती दखलपात्र गुन्हे आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, यापुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये किंवा यासाठी काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांमध्ये प्राण्यांचा वापर करण्यास राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार तसेच इतर सर्व संबंधितांना प्रतिबंध करण्यात यावा. तसेच या सूचनांचे पालन न करणाऱ्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात यावी.

नीला सत्यनारायण
( नीला सत्यनारायण )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी.
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.

5-12413 (150)

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र. ६/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक - ४ फेब्रुवारी, २०१२.

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दिनांक- ९ मे, २००७ अन्वये निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्र व आजूबाजूच्या परिसरात उमेदवारांचा प्रवेश व निवडणूक काळात उमेदवारांनी उघडावयाची प्रचार कार्यालये याबाबत आदेश दिले आहेत. तसेच याबाबत दिनांक- २९/१२/२०११ च्या आचारसंहिता आदेशातही याचा उल्लेख आहे. यासंदर्भात सदर आदेश रद्द करून पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत

उमेदवारांना मतदान केंद्रात प्रवेश करण्याची जी मुभा देण्यात आली आहे त्याचा गैरवापर केला जातो. यामध्ये मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात उमेदवारांने स्वत:ची ओळख करून देणे किंवा मतदान केंद्रात वाजवीपेक्षा जास्त वेळ थांबणे याचा समावेश होतो. मतदारांना ओळख करून देण्याचा प्रकार निश्चितच प्रचारामध्ये मोडतो. तसेच वाजवीपेक्षा जास्त वेळ मतदान केंद्रात थांबणे हा प्रकारदेखील मतदार व निवडणूक यंत्रणा यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न असतो. असे प्रकार टाळण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला अश्या सूचना देण्यात याव्यात की मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात त्याने कोणत्याही व्यक्तीला स्वत:ची ओळख करून देऊ नये किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा प्रचार करू नये. तसेच मतदान केंद्रात प्रवेश केल्यानंतर मतदान प्रक्रियेचे निरीक्षण दोन ते तीन मतदारांचे मतदान होईपर्यंत करावे. त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडणे अपेक्षित असेल. या सूचनांचा भंग करणाऱ्या उमेदवारांस पोलिसांकरवी त्या क्षेत्राच्या बाहेर काढावे.

२. राज्य निवडणूक आयोगाने उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. उमेदवारांनी उघडलेल्या सर्व प्रचार कार्यालयांचा खर्च त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होईल. त्यास अनुसरून किती प्रचार कार्यालये उघडावी यासंदर्भातील मर्यादा काढून टाकण्यात येत आहे. मात्र प्रचार कार्यालयांची परवानगी देताना सर्व उमेदवारांना समान तत्वानुसार परवानगी देण्यात यावी. तसेच महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी आणि पोलीस यंत्रणा यांनी सुरक्षितता आणि जागोजागी प्रचार कार्यालये उघडल्यास नागरिकांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेऊनच प्रचार कार्यालयांना परवानगी दयावी.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( डॉ. अ. द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

निवडणूक प्रचाराबाबत..

**निवडणूक तात्काळ**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १४/२/२०१२

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाने वितरित केलेल्या आचारसंहितेबाबतच्या पुस्तिकेमध्ये असलेल्या प्रश्नावलीतील प्रश्न क्र.५३ वर जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्रचारावर बंदी राहील, आणि एस.एम.एस. चा देखील समावेश राहील असे नमूद आहे.

तथापि, सदरहू सूचनेमध्ये जाहीर प्रचार बंदीनंतर उमेदवाराने घरोघरी जाऊन प्रचार करणे या संदर्भात कोणतीही स्पष्टता नाही.

जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर उमेदवार हे मतदान केंद्राचे १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून तसेच घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील. परंतु माईकचा वापर करता येणार नाही आणि उमेदवारांना समुहानेही फिरता येणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रचारादरम्यान वापरावयाच्या वाहन संख्येबाबत..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र. ३१/का-७,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१६.

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१९/का.५, दि. ११ ऑगस्ट, २००६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी प्रचारफेरी किंवा प्रचारासाठी मिरवणुकांच्यावेळी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची संख्या महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समिती निवडणुकांसाठी ३, तर ग्रामपंचायत निवडणुकीसाठी १ करण्यात आली आहे.

२. राज्य निवडणूक आयोगाकडून आयोजित करण्यात आलेल्या पोलीस व इतर विभागांच्या माहे ऑक्टोबर, २०१६ मधील कार्यशाळेतील चर्चेच्या अनुषंगाने उपरोक्त आदेशात सुस्पष्टता आणण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक झाले आहे. तरी उपरोक्त आदेश अधिक्रमीत करण्यात येत असून पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

i) निवडणूक आचारसंहिता कालावधीत प्रचार फेरी किंवा प्रचार मिरवणुकीत वापरण्यात येणाऱ्या वाहनांची संख्या महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकीत जास्तीत जास्त १० राहील. (यामध्ये जास्तीत जास्त ३ वाहने चारचाकी, वा तीनचाकी असतील व इतर वाहने दुचाकी असू शकतील.) तर ग्रामपंचायत निवडणुकीत सदर मर्यादा ही जास्तीत जास्त ३ राहील. (१ वाहन तीन वा चार चाकी व इतर वाहने दुचाकी असू शकतील)

D:\वाहनांची संख्या.docx

ii) उपरोक्त मर्यादेमध्ये एखाद्या मंत्री वा अन्य प्रचारकाला पुरविण्यात आलेल्या सुरक्षितेसाठीच्या वाहनांचा समावेश होणार नाही. परंतु त्या वाहनांद्वारे प्रचार (फलक / झेंडे वा ध्वनीक्षेपकाद्वारे प्रचार करणे) करता येणार नाही.

iii) प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची पूर्वपरवानगी संबंधित जिल्हाधिकारी / निर्वाचक अधिकारी पोलीस यांचेकडून घेणे आवश्यक राहील. सदर मर्यादेपेक्षा जास्त वाहने वापरणे व परवानगी नसणाऱ्या वाहनांद्वारे प्रचार करणे या दोन्ही गोष्टी निवडणुकांमधील गैरप्रकार मानण्यात येईल. तसेच त्याचा खर्चही प्रचार फेरीच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल. त्यासाठी संबंधित उमेदवार वा संबंधित पक्ष (पक्षाची प्रचार फेरी वा मिरवणूक असल्यास) यांच्यावर भारतीय दंड संहिताअंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

iv) संबंधित यंत्रणेने दिलेली परवानगी ही वाहनाच्या दर्शनीभागी लावणे आवश्यक राहील.

v) प्रचारासाठी वापरण्यात येणारी वाहने ही एकाच उमेदवाराच्या प्रचारासाठी असल्यास त्यासाठीचा खर्च हा उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट होईल. जर सदरचा प्रचार हा पक्षातर्फे वा आघाडीतर्फे करण्यात येत असेल तर सदरची प्रचार फेरी / मिरवणूक ही ज्या प्रभागातून / निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या हद्दीतून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च समप्रमाणात विभागून दाखविण्यात येईल.

(एस.एम. चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती
D:\वाहनांची संख्या.doc

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या आचारसंहिता कालावधीत उमेदवार/ राजकीय पक्ष यांना सभा/प्रचाराकरिता विविध परवानग्या देण्याकरिता "एक खिडकी योजना" राबविण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.३०/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक- २३/११/२०१६

## आ दे श

भारतीय संविधानाच्या तरतुदी (परिच्छेद २४३के व २४३झेडए) अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका त्यांच्या मुदत संपण्यापूर्वी घेण्याची तसेच त्या निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. ही संपूर्ण कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत पार पाडण्यात येते.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कालावधीत आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबाजवणीकरीता महानगरपालिकेसाठी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक सनियंत्रण समिती स्थापन करण्याचे सर्वसाधारण निदेश राज्य निवडणूक आयोगाकडून दिले जातात.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कालावधीत उमेदवार व राजकीय पक्षातर्फे प्रचार फेरी/ सभा/ मिरवणूका तसेच विविध परवानग्यांसाठी विविध विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच निर्वाचक अधिकाऱ्यांकडून परवानगी दिली जाते. या सर्व प्रक्रियेत परवानगी देण्यास विलंब झाल्यास उमेदवारांसाठी सदर बाब अडचणीची होऊ शकते. यासाठी उपरोक्त सनियंत्रण समितीने **भारत निवडणूक आयोगाचे** पत्र क्र.४६४/INST/२०१४-EPS, दिनांक २० मार्च, २०१४ नुसार (प्रत संलग्न) दिलेल्या सूचनांनुसार सर्व निर्वाचक अधिकारी, (ग्रामपंचायतीसाठी तहसिलदार) तसेच महानगरपालिका आयुक्त यांच्या कार्यालयात 'एक खिडकी

योजना' प्रभावीपणे राबविली जाईल याची दक्षता घ्यावी व आवश्यक ती उपाययोजना करावी. तसेच याबाबत सर्व उमेदवार / राजकीय पक्ष यांना माहिती देण्याकरिता आवश्यक ती माहिती देण्यात यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(एम.एम. घत्रे)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती

GE-2014

# ELECTION COMMISSION OF INDIA

NIRVACHAN SADAN, ASHOKA ROAD, NEW DELHI-110001

No. 464/INST/2014-EPS Dated:- 20th March, 2014

To

The Chief Electoral Officers,
of all States/UTs.

**Sub: General Election to the Lok Sabha, 2014 – Instructions regarding SINGLE WINDOW SYSTEM for Public Meetings/Rallies/Processions, use of Loudspeakers and use of vehicles for election campaigning as well as use of non-commercial/remote/ uncontrolled airports/helipads.**

Sir/Madam,

I am directed to refer to the subject cited above and to state that the Commission has directed that a "**Single Window System**" may be set up in the offices of concerned District Magistrate/District Election Officer/Returning Officer (RO) of the Parliamentary Constituencies in all the States/UTs during the election period, to grant permissions to the political parties and candidates for –

a) usage of non-commercial/remote/uncontrolled airports/helipads;

b) organizing public meetings/rallies/ processions, use of loudspeakers; and

c) use of vehicles for election campaigning.

2. In view of the above, DMs/DEOs/ROs of all Parliamentary Constituencies may be directed to follow the instructions/directions during the ensuing General Election to Lok Sabha, 2014, as given below :

i) All DMs/DEOs/ROs (PC) shall set up and operationalize "**Single Window/Permission Cell**" in their offices, which will be equipped with necessary infrastructure such as, photocopier machine, scanner, computer, telephone, etc. and dedicated staff who will provide photocopies of applications received by Permission Cell Incharge, to various Nodal Officers of other departments present in the office of Returning Officer for prompt action at their end with regard to obtaining specific clearances from their respective department.

2) SSP/SP or equivalent level officer of different designations of the district shall designate one officer of the rank of DSP as **Permission Cell Incharge** for each R.O. Office who shall camp in the office premises of DM/RO. He/She will collect and process the applications and issue permission/decision to the applicant after obtaining necessary approval from the competent authority of State Police as well as other local authorities, land owning agencies etc. as per laws.

3) (a) The political party/candidate seeking permission has to apply to the Permission Cell Incharge in the office of the Returning Officer concerned at least **48 hours** before the event along with details of Expenditure Plan in the prescribed format given in Annexure-16 of *Compendium of Instructions on Election Expenditure Monitoring (January 2014)* (copy enclosed) in accordance with the instructions of the Commission.

(b) A political party/candidate may apply through an application for permission in respect of those events/rallies/processions etc. scheduled to be organized within 07 days of making the application (excluding the day of application).

(c) Separate application has to be filed for more than one event on a particular day.

(d) In case an event/rally/procession etc. is to be held in the area covering jurisdiction of more than one District(s) for any Parliamentary Constituency, then separate applications have to be filed with the Permission Cell Incharge in the office of the concerned DM/RO.

4) The Permission Cell Incharge shall also keep a separate register (Log-Book) for keeping the record of applications received, their transmission to Nodal Officers of various departments and final grant of permission/decision indicating date and time of each stage.

5) The Traffic Police related permission shall be obtained by the Permission Cell Incharge and the applicant will not be asked to obtain the same from the Traffic Police separately.

6) **(a) Permission Cell Incharge after obtaining necessary clearance, if any, from other department such as fire, local authorities, land owning agencies etc. will issue the permission to the political parties/candidates <u>within 36 hours</u> of the receipt of application.**

(b) The State Nodal Officer of Police shall send Daily Report of cases of all RO offices where any **permission** is pending for more than 36 **hours**, with reasons, in format <u>SWS-1</u> (Copy annexed).

7) The permission shall be given to the applicant(s) on "First Come First Served" basis from the Single Window only.

8) A copy of permission/decision along with a copy of Expenditure Plan (Annexure-16) shall be submitted by the Permission Cell Incharge to Returning Officer immediately, who in turn will forward it within one hour to the concerned Asstt. Expenditure Observer of Assembly Constituency for making necessary arrangements for videography of the event for the purpose of enforcement of Model Code of Conduct and Election Expenditure Monitoring etc. and to the Asst. Expenditure Observer of Parliamentary Constituency for keeping the record in Folder of Evidence of concerned political party/candidate.

9) For usage of non-commercial/remote/uncontrolled airports/helipads by a political party/candidate, the application will have to be made to the concerned District Magistrate at least 24 hours before landing, mentioning the details of travel plan, place of landing in the district and names of passengers in the aircraft/helicopter. A separate register for keeping record of applications received and their disposal shall be maintained for the purpose. Permission Cell Incharge shall ensure that NOC of Police authorities, if required, is made available to the DM/DEO well within time.

10) The following officers of various departments shall be part of "Single Window System" set up at the office of DM/RO concerned, to coordinate, process and assist in obtaining issuance of No Objection Certificate (NOC)/Permission/Decision from their department as per rules of the department.:-

(i) A Officer of the level of Executive Engineer or above of concerned Municipal Corporations, Cantonment Boards, etc. as the case may be, for use of land, building, premises, ground etc.

(ii) Assistant Divisional Fire Officer or equivalent of the concerned district.

(iii) An Officer of the level of Executive Engineer or above from Electricity Department/Board of the concerned district, for any requirement for temporary electricity connection at meeting site.

11) The above mentioned officers shall follow the following procedure for issuance of NOC/Permission/Decision at Single Window System:-

a) These officers shall camp in the office premises of DM/RO concerned.

b) They will collect photocopy of application for permission submitted by a party/candidate at Single Window System from Permission Cell Incharge who is also camping in DM/RO office.

c) They will process the applications in their respective departments on urgent basis and issue permission/NOC/decision as per departmental rules on the same day of making application on "First Come First Served" basis and deliver to the Permission Cell Incharge for issuance of further permission/decision to the applicants.

d) DM/RO shall ensure necessary sitting arrangements for these officers.

12) An officer of the rank of Assistant Director or above from Transport Department, shall camp in the CEO's Office (Model Code of Conduct Branch) to facilitate obtaining permission/decision in respect of modified vehicles to be used for rally and election campaigning.

3. These instructions shall be displayed on the Notice Board in the office of all DMs/DEOs/ROs as well as other suitable places for public awareness.

4. The General Observers, Expenditure Observers, Asstt. Expenditure Observers, political parties/candidates and all concerned may be informed accordingly.

Yours faithfully,

(SUMIT MUKHERJEE)
SECRETARY

Report: SWS-1

General Election to Lok Sabha, 2014

Report of Pending cases (more than 36 hours) under Single Window System

| S.No. | No. and Name of Parliamentary Constituency (PC) | Name and designation of Permission Cell incharge | Mobile No. | No. of applications pending at Single Window/ Permission Cell for more than 36 hours of the receipt of application | Remarks/ Details of pending application with reasons |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

96

Annexure – 16

Details of Expenditure on Public Meetings/Rallies etc.

(To be given by the candidate/his election agent at the time for applying for permission to hold the Public Meeting/Rally etc.)

Name of District :

No. and Name of Constituency :

Name of Candidate :

Political Party if any :

Date, time and duration of Public Meeting/Rally etc :

[Location] Venue of Public Meeting/Rally etc :

| S.No. | Item of Expenditure | Proposed to be used by the Candidate/his Election Agent | | Proposed to be used by the Political Party | | Proposed to be used by any other Association | | According to the Report of the Officer In-Charge | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Number of Units | Cost | Number of Units | Cost | Number of Units | Cost | Number of Units | Cost |
| 1. | Pandal and fixture | | | | | | | | |
| 2. | Barricading & Arches | | | | | | | | |
| 3. | Tables | | | | | | | | |
| 4. | Chairs | | | | | | | | |
| 5. | Other furniture | | | | | | | | |
| 6. | Loudspeaker & Microphone | | | | | | | | |
| 7. | Posters | | | | | | | | |
| 8. | Banners | | | | | | | | |
| 9. | Cut Outs | | | | | | | | |
| 10. | Digital Boards | | | | | | | | |
| 11. | Illumination items like Serial lights etc. | | | | | | | | |
| 12 | Power connection charges paid/payable to EB etc. | | | | | | | | |
| 13. | Other items | | | | | | | | |
| 14. | ……………… | | | | | | | | |
| | Total | | | | | | | | |

Name and Signature of Candidate/Election Agent/Name and Signature of authorised representative of Political Party/any other Association Officer in-charge

Date :

महानगरपालिका, जिल्हापरिषद / पंचायत समिती
सार्वत्रिक निवडणुका-२०१७
जाहीर प्रचार बंदी, जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणी घेणे, निष्कर्ष प्रसिध्द करण्याबाबतचे निर्देश.

## राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
क्रमांक - रानिआ/ मनपा-२०१७/प्र.क्र. ७ /का.५
दिनांक : २१ जानेवारी, २०१७

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३-झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी; राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे.

३. आणि ज्याअर्थी; राज्यातील २५ जिल्हा परिषदा आणि २८३ पंचायत समित्यांसाठी दिनांक १६ आणि २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मतदान होत आहे. तर १० महानगरपालिकांसाठी दि. २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी मतदान होत आहे.

४. आणि ज्याअर्थी; दोन्ही निवडणुका पाठोपाठ असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या दि.१६/२/२०१६ रोजी होणाऱ्या निवडणुकीनंतर जनमत चाचणी अथवा मतदानोत्तर चाचणी प्रसार माध्यमांनी घेतल्यास अथवा जिल्हा परिषदेच्या निकालाचे अंदाज त्यांनी केलेल्या चाचणीवरुन प्रसिध्द केल्यास त्याचा अन्य जिल्हापरिषदा / पंचायत समित्या अथवा महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पडू शकतो.

५. त्याअर्थी; महानगरपालिका, जिल्हापरिषद व पंचायत समित्या निवडणुकांमध्ये जाहीर प्रचार करण्याकरिता तसेच जनमत चाचणी (Opinion poll) आणि मतदानोत्तर चाचणी (Exit Poll) घेणे व त्याचे निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर खालील कालावधीमध्ये बंदी राहील असे आदेशित करण्यात येत आहे :-

| जाहीर प्रचार / चाचणी बंदी | जिल्हापरिषद / पंचायत समिती | महानगरपालिका |
|---|---|---|
| जाहीर प्रचार बंदी | पहिला टप्पा- १४/०२/२०१७ रात्री १२.०० पासून<br>दुसरा टप्पा- १९/०२/२०१७ रात्री १२.०० पासून | १९/०२/२०१७ संध्याकाळी ५.३० पासून |
| जनमत चाचणी (Opinion poll)<br>मतदानोत्तर चाचणी (एक्झिट पोल) | जिल्हापरिषद / पंचायत समिती व महानगरपालिका निवडणुकांकरिता दि. १४/०२/२०१७ रात्री १२.०० पासून दि. २१/०२/२०१७ रोजी मतदान समाप्तीपर्यंत बंदी. | |

६. वर्तमानपत्रे, नियतकालिके, माहितीपत्रके, फलक किंवा तत्सम प्रसिध्दी, खाजगी किंवा सरकारी रेडीओ, टि.व्ही. केबल, डीटीएच, प्रादेशिक किंवा स्थानिक केबल टि.व्ही., सॅटेलाईट, एसएमएस, इंटरनेट, फेसबुक आणि तत्सम उपलब्ध सोशल मिडिया यांच्याद्वारे जनमत चाचणी व मतदानोत्तर चाचणी यांचे असे कुठलेही निष्कर्ष प्रसिध्द करता येणार नाहीत.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व महानगरपालिका आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
४) मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
५) सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
६) निवड नस्ती.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.20/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रचार साहित्याच्या छपाई व प्रसिध्दीवर आयोगाच्या आदेशान्वये घालण्यात आलेल्या निर्बंधाबाबत स्पष्टीकरण.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/१०९५/७७/९५/डेस्क-३, दि. २८/८/१९९५

२) राज्य निवडणूक आयोगाचे आदर्श आचारसंहितेबाबतचे क्र. रानिआ / नप-२०१६/ प्र.क्र.३१/का.६, दि. १४/१०/२०१६चे आदेश.

महोदय / महोदया,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये प्रचारासाठी पोस्टर्स व पॅम्प्लेट ची छपाई व प्रसिध्दीवर आयोगाचे संदर्भांकीत दि. २८/८/१९९५ च्या आदेशान्वये काही निर्बंध घालण्यात आले आहेत. या आदेशातील तरतुदीनुसार प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर मुद्रणालयाचे नाव, प्रकाशकाचे नाव, छापण्यात येणाऱ्या प्रतींची संख्या हा तपशील नमूद करणे आवश्यक आहे. मात्र प्रत्येक प्रतीवर प्रत क्रमांक नमुद करणे आवश्यक करण्यात आलेले नाही. तथापि, राज्य निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेबाबत दि. १४/१०/२०१६ रोजी निर्गमित केलेल्या आदेशातील भाग-३ मधील परिच्छेद ६ मध्ये आयोगाच्या दि. २८/८/१९९५ चा उल्लेख करण्यात आला असून, त्या आदेशानुसार प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर प्रतीची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव व पत्ता नमूद करणे आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत

प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर प्रत क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात येत आहे.

२. याबाबत स्पष्ट करण्यात येते की, प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्याच्या प्रत्येक प्रतीवर प्रत क्रमांक नमूद करण्यासाठी आग्रह धरण्यात येऊ नये.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र